479

**महाराष्ट्र प्रदुषण नियत्रण मडळ**

कल्पतरु पाईट इमारत, २ रा मजला,
सिने प्लॅनेट सिनेमासमोर, सायन-माटुंगा
स्किम रोड नं.८, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२

जा.क्र.:मप्रनि/विधी व योजना विभाग/ब-४५२१ दिनांक :२९/०७/२००९

प्रति,

प्रादेशिक अधिकारी,
मुंबई/नवी मुंबई/ ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/ नागपूर/नाशिक/
कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/नवी मुंबई-१/नवी मुंबई-२/
तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/ कल्याण-३/रायगड-१/रायगड-२/रायगड-३/महाड/कोल्हापूर/
सांगली/रत्नागिरी/ चिपळूण/पुणे-१/पुणे-२/पिंपरी-चिंचवड/ सातारा/ सोलापूर/औरंगाबाद-१/
औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/ नाशिक/अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/नागपूर-१/
नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/ परभणी/ लातूर/भंडारा.

## परिपत्रक

**विषय : शहरातील मटण/मांस/चिकन इत्यादी विक्रेता यांना मप्रनि मंडळाचे संमतीपत्र देणेबाबत**

**संदर्भ : उप-प्रादेशिक अधिकारी,मप्रनि मंडळ, सांगली यांचे पत्र क्र.उप्राकासां/तांशा/९३७, दिनांक १७/६/२००९**

---------

उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सांगली यांनी दिनांक १७/६/२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद, विटा, ता.खानापूर, जिल्हा : सांगली यांनी त्यांच्या दिनांक १९/७/२००९ च्या परिपत्रकाद्वारे शहरातील सर्व मटण/मांस/चिकन विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना मप्रनि मंडळाचे संमतीपत्र/ना हरकत दाखला घेण्याबाबत कळविले.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने शहरातील मटण/मांस/चिकन विक्रेते हे मप्रनि मंडळाच्या सांगली उप-प्रादेशिक कार्यालयात संमतीपत्र/ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत विचारणा करीत असल्यामुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सांगली यांनी सदर मटण/मांस/चिकन विक्रेत्यांनी मप्रनि मंडळाचे संमतीपत्र घेणे गरजेचे आहे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करण्याबाबत विनंती केली होती.

...२..

सदर बाब या कार्यालयाच्या दिनांक २/७/२००९ च्या कार्यालयीन टिप्पणीद्वारे सादर केली असता असा निर्णय झाला की, मटण/मांस विक्रेत्यांना संबंधीत महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदांतर्फे शॉप्स आणि एस्टॅब्लिशमेंट ॲक्टनुसार परवानगी मिळत असल्यामुळे, त्यांनी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे योग्य होईल.

सर्व प्रादेशिक अधिकारी/उप-प्रादेशिक अधिकारी यांना या परिपत्रकाद्वारे वरील निर्णय आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

( द. त्रि. देवळे )
वरिष्ठ विधी अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर : सदस्य सचिव, मप्रनि मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. जल प्रदूषण निवारण अभियंता (PCI-III)/हवा प्रदूषण निवारण अभियंता/प्रधान वैज्ञानिक अधिकारी(PCI-I)/प्रोजेक्ट लिडर(झोनिंग ॲटलास), मप्रनि मंडळ.
२. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी(मध्यवर्ती प्रयोगशाळा,महापे)/सांख्यिकी अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई.
३. विधी अधिकारी (श्री भुरे)/विधी अधिकारी (श्री पुरकर), मप्रनि मंडळ, मुंबई.
४. प्रादेशिक अधिकारी -(PCI-II)/घातक धनकचरा व्यवस्थापन (मुख्यालय)/प्रकल्प व योजना/समन्वय/पॅम्स, मप्रनि मंडळ, मुंबई
५. मुख्यालयातील सर्व उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई
६. सर्व सहाय्यक विधी अधिकारी, विधी व योजना विभाग, मप्रनि मंडळ, मुंबई.

श्रीमती साधले